प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ३० जुलै २०२४**

**सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजनांविषयी पसरवण्यात येत असलेल्या अफवांना बळी पडू नका - सिडकोचे आवाहन**

सिडको महामंडळामार्फत नवी मुंबईतील विविध ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सदनिका बांधण्यात येत आहेत. **सदर सदनिकांच्या विक्रीसाठीची गृहनिर्माण योजना अद्याप सिडकोमार्फत सादर करण्यात आलेली नाही.** परंतु काही सामाजिक माध्यमांद्वारे सिडको महागृहनिर्माण योजने संदर्भात जनतेमध्ये चुकीची माहिती प्रसारित होत असल्याचे निदर्शनास येत आहे.

सिडको महामंडळाने या सदनिकांच्या विक्रीसाठी कोणत्याही सेवा केंद्र अथवा एजन्सीची नेमणूक केलेली नाही. याबाबत खासगी व्यक्ती किंवा संस्था यांच्यामार्फत पसरविण्यात येणा-या खोट्या व चुकीच्या जाहीराती/योजना/बातम्या यांना बळी पडू नये, असे सिडकोतर्फे जनतेस आवाहन करण्यात येत आहे. अशा अफवांना बळी पडून फसवणूक झाल्यास त्यास सिडको जबाबदार राहणार नाही, याची कृपया सर्व नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

तसेच, अशा प्रकारच्या खोट्या बातम्या अथवा माहिती निदर्शनास आल्यास जनतेनी कृपया सिडकोच्या दक्षता विभाग, ६ वा मजला, सिडको भवन यांच्याकडे लेखी तक्रार करावी. तसेच सिडकोमार्फत जाहीर करण्यात येणा-या योजनेबाबत अधिकची माहिती हवी असल्यास किंवा योजनेत अर्ज दाखल करण्यात अडचणी येत असतील तर त्याचे निराकरण करण्यासाठी लोकांनी निवारा केंद्र, ७ वा मजला, बेलापूर रेल्वे स्थानक, नवी मुंबई किंवा पणन (गृहनिर्माण) विभाग, ३ रा मजला, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे प्रत्यक्ष भेट द्यावी, ही विनंती.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**